Tarak Dry Fruit
Step in for Health
• डिंकलाडू सामग्री
• बेस्ट क्वालिटी ड्रायफ्रुटस्, पेंडखजूर
सिटी प्राईड बिल्डींग, डोमिनोज पिझ्झा के निचे, मोंढानाका के पास जालना रोड, औरंगाबाद मो.97632 64854 फोन (0240) 6614525
LUNIYA / 2358501

## विद्यापीठात विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळा

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने येत्या २ व ३ डिसेंबर रोजी विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सकाळी ११ ते ३.३० वाजता या वेळेत चालणाऱ्या दोन दिवसांच्या कार्यशाळेत शोधनिबंध लेखन तंत्र, विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय फेलोशिप, बौद्धिक संपदा हक्क, चित्रपट परीक्षण व प्रसारमाध्यमातील लेखन तंत्र,मराठी चित्रपट व्यवसायातील संधी या विषयावर मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### विजयानंद इंगळे यांना पीएच.डी.



**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने विजयानंद ज्ञानदेव इंगळे यांना रसायनशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली. कॅप्टन डॉ. सुरेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली 'सिंथेसिस कॅरेक्टरायझेशन अँड फिजिओ केमिकल प्रॉपर्टीज ऑफ मेटल कॉम्प्लेक्सेस ऑफ समर बायोॲक्टिव्ह लिग्यांड्स'या विषयावर शोधप्रबंध सादर केला.

### हुतात्म्यांना श्रद्धांजली

**औरंगाबाद :** प्रेरणा ट्रस्ट निवासी अस्थिव्यंग कार्यशाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संविधानाचे वाचन करण्यात आले. तसेच २६/११ च्या मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात अमर झालेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी प्राचार्य पाटील, निदेशक निलावती पाटील, संजय शेजूळ, गंगाधर नाईक, साहेबराव म्हस्के,राजू पवार यांच्यासह अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### म. जोतिबा फुले यांना अभिवादन

**औरंगाबाद :** नालंदा मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर सायन्स महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य ए. एस. गडकरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. राहुल म्हस्के होते. कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल साळवे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. म्हस्के यांनी जोतिबांच्या जीवनकार्याविषयी मार्गदर्शन केले. प्रा. गडकरी, प्रा. अंकिता अमृतकर, रुपा भदर्गे, योगिता सुरे यांनी त्यांची मते मांडली. संचालन प्रा. वृषाली पुरंदरे यांनी केले. प्रा. कोमल बिरारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रियंका वेताळ, विशाल दाभाडे यांनी परिश्रम घेतले.

### घाटीत पाणी वाया

**औरंगाबाद :** घाटी रुग्णालयात ठिकठिकाणी पाण्याच्या टाक्या आणि जलवाहिनींना गळती लागली आहे. त्यामुळे पाणी वाया जाण्याचा प्रकार होत आहे. गळतीमुळे सोमवारी थेट घाटीतील रस्त्यापर्यंत पाणी वाहत होते. प्रशासनातर्फे लवकरच दुरुस्तीचे काम हाती घेऊन हा प्रकार थांबविण्यात येणार आहे.

### मुकुल मंदिरचे यश

**औरंगाबाद :** मुकुल मंदिर शाळेतील सहावी ते नववीतील १७ विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळविले. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची पुढील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक जयंत चौधरी, सुरेश परदेशी यांच्यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## कामगारांनाही नोटाबंदीची झळ

**औरंगाबाद : नोटाबंदीची** झळ आता 'लेबर कॉन्ट्रॅक्टर्स'नाही बसली आहे. कंपन्यांनी 'आरटीजीएस'च्या माध्यमातून बँकेत कामगारांचे वेतन जमा केल्यानंतरही बँकेत पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्यामुळे कंत्राटदारास ५ हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे देण्यास असमर्थ ठरली आहे.

यासंदर्भात नंदनवन कॉलनी येथील सामाजिक कार्यकर्ता तथा सुयश इंटरप्रायजेस या 'लेबर सप्लायर्स' कंत्राटदार कंपनीचे संचालक अजय यादव यांनी सांगितले की, समर्थनगर येथील बडोदा बँकेत त्यांच्या फर्मचे खाते आहे. कामगारांचे वेतन अदा करण्यासाठी ते सकाळी बँकेत गेले. त्यांनी पैशाची मागणी केली असता ५ हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे देता येणार नाहीत, असे त्यांना व्यवस्थापकाने सांगितले. त्यांनी बँक व्यवस्थापकाकडे जाऊन या बँकेत आपल्या फर्मचे खाते असून, त्यावर 'आरटीजीएस'च्या माध्यमातून पैसे टाकण्यात आलेले आहेत. त्यामुळे मला किमान २५ हजार रुपये तरी देण्यात यावेत, अशी मागणी केली. मात्र, बँकेने त्यांना तेवढी रक्कम देण्यास असमर्थता दर्शवली. त्यामुळे कामगारांचे वेतन कसे अदा करावे, या विवंचनेत ते बँकेतून बाहेर पडले.

नोटाबंदीचा फटका सर्वसामान्य नागरिक सहन करीत आहेत. नोटाबंदीच्या निर्णयावर यादव यांनी कडवट प्रतिक्रिया व्यक्त करीत ते तेथून निघून गेले.

### यूजीसी : बाराव्या पंचवार्षिक योजनेचा निधी बंद

# राज्य विद्यापीठांना केंद्र सरकारचा ठेंगा

**औरंगाबाद : विद्यापीठ** अनुदान आयोगाने (यूजीसी) १२ व्या पंचवार्षिक योजनेत घोषित केलेला निधी राज्य विद्यापीठांना देणे बंद केले आहे. मात्र, चालू शैक्षणिक वर्षात याला देशातील १५९ विद्यापीठांपैकी १६ विद्यापीठे अपवाद आहेत. उर्वरित राज्य विद्यापीठांना मात्र केंद्र सरकारने ठेंगा दाखवला आहे. महाराष्ट्रातील एकूण १२ राज्य विद्यापीठांपैकी केवळ नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला २ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी चालू शैक्षणिक वर्षात मंजूर केला आहे. यामुळे केंद्र सरकार राज्य विद्यापीठांना सापत्न वागणूक देत असल्याचे यूजीसीच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग देशातील केंद्रीय, राज्य आणि अभिमत विद्यापीठात शैक्षणिक पायाभूत सेवा, सुविधा आणि नवीन पदे पंचवार्षिक योजनेत मंजूर करते. पाच वर्षांत विद्यापीठांना देण्यात येणाऱ्या निधीची तरतूदही यात समाविष्ट असते. २०१२ ते २०१७ या कालावधीतील १२ व्या पंचवार्षिक योजनेत राज्य विद्यापीठांना तब्बल २ हजार ७८ कोटी ३५ लाख रुपये निधीची तरतूद करण्यात आली होती. त्यावेळी सत्तेत असलेल्या काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात योजनेच्या पहिल्याच वर्षी राज्य विद्यापीठांना ५३७ कोटी ७३ लाख रुपयांचा निधी दिला आहे. यानंतर केंद्रात सत्ताबदल होत २०१४ मध्ये भाजपचे सरकार आले.

या सरकारने पहिल्याच वर्षी राज्य विद्यापीठांना २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात केवळ १५ कोटी ९४ लाख रुपये एवढाच निधी मंजूर केला, तर २०१५-१६ मध्ये यात वाढ करत ४९ कोटी २१ लाख रुपये निधी देण्यात आला. चालू शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये देशातील केवळ १६ विद्यापीठांना ५३ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी दिला. यात महाराष्ट्रातील १२ विद्यापीठांपैकी नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा समावेश असल्याचे यूजीसीने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात स्पष्ट झाले आहे.

### केंद्र व राज्य असा भेदाभेद

- मोदी सरकारने सत्तेत आल्यानंतर एकाही राज्य विद्यापीठाला केंद्रीय दर्जा देण्यात येणार नसल्याचा धोरणात्मक निर्णय घेतला होता. यानंतर यूजीसीकडून देण्यात येणारा निधी जवळपास बंद केला. तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालयाने राज्य विद्यापीठांना आर्थिक दिलासा देणाऱ्या यूजीसीचेच आर्थिक शोषण सुरु केले असल्याचे विविध शिक्षणतज्ज्ञांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले.

### महाराष्ट्रातील विद्यापीठांची स्थिती

- १२ व्या पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला १२.१९ कोटी,
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्यापीठाला ९.९८ कोटी,
- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला १०.६२ कोटी,
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाला १७.५९ कोटी,
- एसएनडीटी विद्यापीठाला १८.९२ कोटी,
- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला १३.९९ कोटी,
- शिवाजी विद्यापीठाला १५.११ कोटी,
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला १२.२५ कोटी,
- मुंबई विद्यापीठाला ३३.३१ कोटी,
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला २६.८४ कोटी,
- कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठाला प्रत्येकी ७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता.
- यूपीए सरकारच्या काळात सर्वच विद्यापीठांना पहिला हप्ता मोठ्या प्रमाणात मिळाला. मात्र, मोदी सरकारने २०१४-१५, १५-१६ आणि १६-१७ या शैक्षणिक वर्षात केवळ नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठाला चालू वर्षात २ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी दिला आहे.



'माता की चौकी' या कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना श्वेता त्रिपाठी आणि माहेश्वरी प्रगती महिला मंडळाच्या सदस्या.

## प्रगती महिला मंडळाचा कार्यक्रम उत्साहात

### 'माता की चौकी' : श्वेता त्रिपाठी यांचा भक्तिसंगीताला दाद

**औरंगाबाद : माहेश्वरी** प्रगती महिला मंडळ तसेच साथी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'माता की चौकी' या संगीतमय सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी खास पुणे येथून श्वेता त्रिपाठी आल्या होत्या. सोमवारी सायंकाळी तापडिया नाट्य मंदिरात झालेल्या या कार्यक्रमास महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

समाजातील मान्यवर अतिथींच्या हस्ते दीप प्रज्वलन करून तसेच मंगलमय वातावरणात देवीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. भक्तिमय गीत-संगीतावर आधारलेला हा कार्यक्रम सभोवताली पवित्रतेची उधळण करणारा ठरला. त्रिपाठी यांनी संगीताच्या माध्यमातून शंकर- पार्वती, राधा-कृष्ण तसेच देवीची आराधना केली. टाळ्यांच्या कडकडाटाने रसिकांनी या कार्यक्रमास दाद दिली. मंडळाच्या अध्यक्षा तारा सोनी, सचिव सुलोचना मुंदडा तसेच साथी सेवा संघाच्या अध्यक्षा किरण शर्मा यांची याप्रसंगी विशेष उपस्थिती होती.

प्रकल्पप्रमुख म्हणून माधुरी धुप्पड, स्वाती तोतला, संगीता करवा आदींनी काम पाहिले. संचालन किरण शर्मा यांनी केले. प्रवेशद्वारावर देवीच्या सत्संगाविषयी धार्मिक संदेश देणारी सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. ही रांगोळी येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमिला काबरा, पुष्पा बाहेती, मीना नावंदर, भारती जाजू, बबिता करवा, उषा धूत, अर्चना भट्टड, पुष्पा लड्डा, स्मिता सोनी, ज्योती गिल्डा, स्मिता मुंदडा, प्रेमा तोतला, उषा लोहिया, मनीषा तोतला, नम्रता राठी, प्रमिला चांडक, सुधा खटोड, सरिता बलदवा, ज्योती तोतला आदींचे सहकार्य लाभले. देवीच्या प्रसादाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

### करिअर मार्गदर्शन : लोकमत व व्ही. आय. टी. विद्यापीठाचा उपक्रम

## 'फ्युचर मंत्रा' ने मिळाली नवी दिशा

**औरंगाबाद : बारावीनंतर** अभियांत्रिकीच्या कोणत्या संस्थेत प्रवेश घ्यावा यासह पालक आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या असंख्य प्रश्नांचे निरसन रविवारी लोकमत आणि व्ही. आय. टी. आयोजित 'फ्युचर मंत्रा' या कार्यक्रमाद्वारे करण्यात आले.

बारावीच्या परीक्षेसाठी शेवटचे काही महिने शिल्लक राहिले आहेत. विद्यार्थ्यांचा अभ्यास जोमात सुरु असला तरीही परीक्षेनंतर नेमके काय करावे, अभियांत्रिकीसाठी कुठल्या संस्थेत प्रवेश घ्यावा, असे असंख्य प्रश्न विद्यार्थ्यांना आणि पालकांना पडले आहेत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारा हा उपक्रम लोकमत भवन येथे घेण्यात आला. विज्ञान शाखेत करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व्ही. आय. टी. विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. गिरीश जोशी आणि सहायक प्राध्यापक डॉ. राजा दास यांनी मार्गदर्शन केले. व्ही. आय. टी. विद्यापीठाची माहिती देणारा माहितीपट दाखवून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर व्ही. आय. टी. विद्यापीठात असणारी शिक्षणपद्धती, प्रवेश परीक्षा, विद्यार्थ्यांना असणारे विषय निवडीचे स्वातंत्र्य, अभ्यासक्रम पूर्ण होण्याच्या आधीच निर्माण होणाऱ्या नोकरीच्या संधी याविषयी डॉ. जोशी यांनी सविस्तर माहिती दिली. व्ही. आय. टी. येथे जवळपास १६०० डॉक्टरेट प्राध्यापक ३२००० पेक्षाही अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत, विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट भविष्य घडविणारे हे विद्यापीठ गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करत नाही, असेही डॉ. जोशी म्हणाले.

शालेय जीवनात विद्यार्थ्यांना 'सोल्युशन ओरिएन्टेड' बनविले जाते; परंतु व्ही. आय. टी. मध्ये विद्यार्थ्याला 'मेथड ओरिएन्टेड' शिक्षण दिले जाते अशी माहिती डॉ. दास यांनी दिली. व्ही.आय. टी. येथे विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुणवत्तेचा कस लावणारे अनेक उपक्रम रोज घेतले जातात, त्यामुळे विद्यार्थी नोकरीच्या स्पर्धेत उतरण्यासाठी पूर्णपणे तयार होतो असे डॉ. दास यांनी सांगितले.

यानंतर पालकांना आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या करिअरविषयक अनेक प्रश्नांचे दोन्ही तज्ज्ञांनी निरसन केले. याप्रसंगी विद्यार्थी आणि पालकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

लोकमत | VIT University Present FUTURE मंत्रा



लोकमत व व्ही. आय. टी. विद्यापीठ आयोजित 'फ्युचर मंत्रा' कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी व पालक. यावेळी विद्यार्थ्यांना डॉ. गिरीश जोशी व डॉ. राजा दास. यांनी मार्गदर्शन केले.



डॉ. गिरीश जोशी.



डॉ. राजा दास.

## हैं तय्यार हम...

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME

### मी धावणार माझ्यासाठी



"लोकमत आयोजित मॅरेथॉन हा सामान्य माणसासाठी खूप चांगला उपक्रम असून, मी यामध्ये सहभागी होणार आहे. तसेच जास्तीत जास्त लोकांनी स्वत:च्या फिटनेससाठी, भविष्यासाठी या स्पर्धेत सहभागी व्हावे व या स्पर्धेचा आनंद घ्यावा.

डॉ. उन्मेश टाकळकर (डायरेक्टर, सिग्मा ग्रुप ऑफ हॉस्पिटल)




**जायंटस् ग्रुप ऑफ औरंगाबाद प्राईड...** (डावीकडून) सचिन चव्हाण, शाम खाटोड, अभय शहा, निखिल सारडा, प्रवीण सोमाणी, विनोद अग्रवाल, नितीन मालानी, नंदकिशोर मालपानी, राजेश वैष्णव, एकता वैष्णव, पल्लवी मालानी, शीतल अग्रवाल, श्वेता सोमाणी, स्वाती खटोड, कल्पना चव्हाण.



**रेड हाऊस इंटरनॅशनल स्कूल...** (डावीकडून) वृंदा दळवी, स्वर्णपाल जबिंदा, रिचा गव्हाडे, वालरेन डिसुझा (प्रीसिपल), हर्षिता नायर, ममता यादव.




**औरंगाबाद शहर ग्रामीण पत्रविक्रेता संघटना...** (डावीकडून) सुरेंद्र पटेल, गणेश भोसले, चंद्रकांत भालेराव, भानुदास घुगे, काकासाहेब मानकापे, सर्जेराव शिंदे, नीलेश फाटके, संतोष जटाळे, राम काळे, अण्णासाहेब जगताप, अजित शिंदे, माणिक कदम, भीमराव वायभट, नितीन दाड, दिलीप जगताप, आसाराम कुलकर्णी, रामकृष्ण राऊत, मोहंमद फहीम.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION | ERA INTERNATIONAL SCHOOL
Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Partners: रवि मसाले | blueumbrella

### नाव नोंदणी व सहभागासाठी

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

## काबरा महाविद्यालयाचा राखीव ठेवलेला निकाल द्या

### आदेश : औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय



**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने अतिरिक्त प्रवेश दिल्याच्या कारणामुळे विजयेंद्र काबरा समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील गुणपत्रिका राखीव ठेवल्या होत्या. याविरोधात महाविद्यालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. यावर न्यायालयाने महाविद्यालयाचा राखीव निकाल देण्याचे आदेश विद्यापीठ प्रशासनाला दिले आहेत.

राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार विजयेंद्र काबरा समाजकार्य महाविद्यालयामध्ये ४७ विद्यार्थ्यांना अतिरिक्त प्रवेश देण्यात आला होता. या अतिरिक्त प्रवेशाचा महाविद्यालयाला नियमानुसार २७ हजार रुपये दंड बसत होता. मात्र विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी अतिरिक्त दंडाची आकारणी करत प्रतिविद्यार्थी ५ हजार रुपये दंड आकारला. याच वेळी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या इतर महाविद्यालयांना मात्र यातून सूट देण्यात आली होती. तसेच काबरा महाविद्यालयाने दंड भरला नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका राखून ठेवल्या होत्या. महाविद्यालयाने याविरोधात अनेक वेळा कुलगुरु, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक यांना निवेदने दिल्यानंतरही गुणपत्रिका देण्यात आल्या नाहीत. यामुळे शेवटी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करत गुणपत्रिका देण्याची मागणी केली होती. यावर न्यायमूर्ती आर.एम. बोर्डे आणि न्यायमूर्ती संगीतराव पाटील यांच्या पीठाने सुनावणी घेत विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका तात्काळ देण्याचे आदेश दिले आहेत.

## वाणिज्य वार्ता



औरंगाबाद जिल्हा नागरी व पगारदार पतसंस्थेच्या सहकारी संघातर्फे अखिल भारतीय सरकारी सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.


### अखिल भारतीय सहकारी सप्ताह

**औरंगाबाद : औरंगाबाद** जिल्हा नागरी व पगारदार पतसंस्थेच्या सहकारी संघातर्फे अखिल भारतीय सरकारी सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. टिळकपथ येथील न्यू अजिंठा नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात अध्यक्ष डी. एस. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली हा सप्ताह पार पडला.

याप्रसंगी सहकार प्रशिक्षण केंद्रातील सहकार शिक्षणाधिकारी ए. यू. सूर्यवंशी यांनी सहकाराच्या माध्यमातून कौशल्य व उद्योजकता विकास या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्हा बँकेचे संचालक ॲड. शांतीलाल छापरवाल यांनी ६३ व्या अखिल भारतीय सहकारी सप्ताहानिमित्त सहकाराची महती पटवून दिली.

यावेळी एस. जे. खंडागळे, बी. डी. पाटील, मनोहरशेठ, रमेश रुणवाल, मुथाजी, वि. का. कुमावत, रमेश निकम हनुमंतखेडा, बन्सीधर निकम, गोपाल पाटील, एस. के. गोरे, एस. जी. उमापुरे, आर. व्ही. परदेशी, संजय पाटील, सुधीर देवकर, अर्जुन पाटील, एस. एस. सोळुंके आदी उपस्थित होते.

SPORTS CAMP
Discover the Hidden Sports-person within Your Child
Inspire your child to shine out in the world



Gymnastics | Tennis | Cricket
Key Features of Sports Camp :
• Develops Sport And Life Skills. • Increases Flexibility, Stamina, Power & Speed.
• Improves the Movement Skills. • Builds Confidence, Connection & Creativity.
Monday To Friday | Timing: 5:00 to 7:00 pm
ENROLL NOW to make Your Child Physically Fit & Sporty
To Register Call
9850372800, 9527752800
Lokmat Bhavan, Jalna Road, Aurangabad
The yellow door aurangabad
The Yellow door
In Association with RELAX - ZEAL Fitness and Relaxation Services